Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

३५/२०२५

**विषय** — आर्थिक वर्ष सन २०२४—२०२५ मध्ये जमा झालेल्या रक्कमेचा ताळमेळ दि. २० सप्टेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करणेबाबत

सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, प्रशासकीय अधिकारी यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभागांमध्ये आणि अधिविभागांमध्ये विद्यार्थी, महाविद्यालये आणि इतर संबंधित घटक (कॉन्ट्रॅक्टर, पुरवठादार) इत्यादी कडून वेगवेगळया रक्कमा जमा केल्या जातात. सदरच्या रक्कमा किती जमा होणे अपेक्षित होते आणि किती जमा झाल्या याचा ताळमेळ घेणे लेखा संहितेनुसार आवश्यक होते. या संदर्भात वित्त व लेखा विभागाकडून वारंवार परिपत्रके निर्गमित करण्यात येतात. तथापि, अशा प्रकारचा ताळमेळ बहुतांश विभाग/अधिविभाग यांच्याकडून घेतला जात नाही. असे निदर्शनास आले आहे.

सबब, आदेशान्वये कळविण्यात येते की, **आपल्या विभागाकडून सन २०२४—२०२५ या आर्थिक वर्ष मध्ये जमा झालेल्या रक्कमेचा ताळमेळ दि. २० सप्टेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करावयाचा आहे.** यासंदर्भात कोणतीही तांत्रिक अडचण असल्यास श्री. ए. बी. चौगुले, अंतर्गत लेखा परिक्षण व श्री ए. ए. रेडेकर, प्रभारी संचालक, संगणक केंद्र यांचेशी संपर्क साधावा.

सदर बाबत महालेखापाल यांच्याकडून करण्यात आलेल्या ऑडिट दरम्यान नोंदविण्यात आलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने मा. महालेखापाल कार्यालयास याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करावयाचा असल्याने सदरचे कामकाज प्राधान्याने करण्यात यावे.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**कुलसचिव**

**जा. क्र. आस्थापना/** 1855

दि. 10 SEP 2025

**प्रति,**

माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी/विद्यार्थीनीं

२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.